# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

मा. ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ११

सभावृत्तांत

दिनांक ०१/०२/२०१९ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका मा. ड प्रभाग समितीची माहे फेब्रुवारी २०१९ ची नियमित मासिक सभा शुक्रवार दिनांक ०१/०२/२०१९ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. कदम शशिकांत गणपत | सभापती |
| १) | मा. श्रीमती दर्शले रेखा राजेश | सदस्या |
| २) | मा. श्री. कलाटे राहुल तानाजी | सदस्य |
| ३) | मा. श्रीमती गायकवाड ममता विनायक | सदस्या |
| ४) | मा. श्री. कस्पटे संदिप अरुण | सदस्य |
| ५) | मा. श्री. बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ६) | मा.श्री. विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी काटे | सदस्य |
| ७) | मा. श्री. आंगोळकर सागर सुनिल | सदस्य |

---------

तसेच खालीलप्रमाणे नामनिर्देशित सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) मा. श्री. भुमकर चंद्रकांत बाबुराव

२) मा. श्री. नखाते संदीप भानुदास

--------

याशिवाय सभेस मा. विजय खोराटे क्षेत्रिय अधिकारी, मा.सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. देवण्णा गट्टुवार, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, मा. बाबासाहेब गलबले, कार्यकारी अभियंता, विद्युत, मा. प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता, जलनि:सारण,मा. डी.एन. गायकवाड, उद्यान अधिक्षक, मा. व्ही.एन. देसले, मा. सुनिल पाटील, उपअभियंता, स्थापत्य, मा. डी.डी. पाटील, उपअभियंता, बीआरटीएस, मा. माधव सोनवणे, उपअभियंता, विद्युत, मा. भाऊसाहेब साबळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. सुर्यकांत मोहिते, उपअभियंता, जलनि:सारण, मा. भागवानी एस.ए. उपअभियंता, नगररचना, मा. लागू ए.ए. प्र. लेखाधिकारी, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. मोरे सुधीर , मा. एस.एच. खोत,

मा. वर्षा कदम, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. मोरे बी.जी., कनिष्ठ अभियंता, स्थापत्य उद्यान, मा. कावळे एम.डी., मा. भालेराव एस.डी., कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. बी.एम. मुलाणी, मा. जयवंत रोकडे, मा. ढोले बी.आर. कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. प्रविण धुमाळ, मा. दीक्षित ए.ए., मा. सी.एम. कुंभार, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. संजय चव्हाण, कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, मा.आर.एम. सौदाई, मा. मोरे शशिकांत, एम., मा.कोतवडेकर संदीप, मा. सरोदे व्ही.एस. आरोग्य निरीक्षक, मा. गेंगजे व्ही.एस., क्रीडा निरीक्षक, मा. चंद्रकांत मोरे, हॉर्टी. सुपरवायझर, मा.डी.एम. कोटीयाना, आरोग्य निरीक्षक, पशूवैद्यकीय विभाग, मा. ए.पी. मद्रासी, मलेरिया इन्सपेक्टर, मा. जे.व्ही. पटेल, सहा. उद्यान अधिक्षक, मा. दुदुसकर एस.एस., खैरे जी.एन. उद्यान सहाय्यक, इ. अधिकारी उपस्थित होते.

-----------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे फेब्रुवारी २०१९ च्या दि. १/०२/२०१९ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा.सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

तदनंतर माहे फेब्रुवारी २०१९ च्या नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले व सन्मा. सदस्यांनी मागणी केलेप्रमाणे व मा. सभापती यांचे मान्यतेने ऐन वेळचे विषय दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्र. १** : प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागर येथे संपूर्ण महाराष्ट्रातील जवळ जवळ २ कि.मी. लांब (कोकणे चौक ते स्वराज चौक) लिनिअर अर्बन गार्डनचे काम चालू आहे. सदर गार्डन पिंपळे सौदागर तसेच पिंपरी चिंचवड शहरातील मानाचा तुरा म्हणुन ओळखले जाणार आहे. सदर प्रभाग हा स्मार्ट सिटीमध्येही समाविष्ट केला गेला आहे. त्यामुळे या परिसरात बहुतांश नागरीक या उद्यानाला पसंती देत आहेत. तरी या गार्डनला “श्री छत्रपती शिवाजी महाराज लिनिअर अर्बन गार्डन” असे नाव देणेबाबत

**विषय क्र.** २ :प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागर येथील पीसीएमसी मैदान, रोझ आयकॉन सोसायटी शेजारी. पिंपळे सौदागर येथे गेल्या ३ वर्षापासुन श्री संत शिरोमणी सावतामाळी अभियानांतर्गत शेतकरी आठवडे बाजार श्री. नृसिंह ॲग्रो फार्म्स प्रोडयुसर कंपनी लि. मार्फत चालवला जात असुन सदर अभियानांतर्गत पि.सी.एम.सी. मैदान, रोज आयकॉन सोसायटी जवळ, पिंपळे सौदागर , पुणे – २७ येथे दर रविवारी दुपारी ३ ते रात्री ८ या वेळेत आठवडा बाजार भरविण्यास महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालय, पुणे यांस मनपाने निश्चित केलेल्या आठवडे बाजार धोरणातील अटी शर्तीनुसार परवानगी देणे बाजारास अधिकृत परवानगी मिळणेबाबत

**तदनंतर विषयपत्रिकेवरील खालील विषयांवर मान्यता देणेत आली.**

विषय क्र. १ ठराव क्र. ३९

दिनांक: ०१/०२/२०१९ विभाग : नगररचना विभाग

सुचक : मा. रेखा राजेश दर्शले अनुमोदक : मा.अश्विनी विक्रम वाघमारे

संदर्भ : मा. रेखा राजेश दर्शले यांचेकडील दिनांक ३/१/२०१९ चा प्रस्ताव

मौजे पुनावळे येथील जांबे हद्दी शेजारील नाल्याजवळ.नं.४१ व ४२ मध्ये मोठया प्रमाणात लोक वाढ होत असुन वस्ती व गावातील रस्ते हे वाहतुकीच्या दृष्टीने कमी पडत आहेत. त्यामुळे मौजे पुनावळे येथील स.नं. ४१ व ४२ मधुन जांबे हद्दीवर असलेल्या नाल्यालगत ९ मी. रुंदीचा डी.पी. रस्ता महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम २०५ अन्वये घोषित करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------

विषय क्र. २ ठराव क्र. ४०

दिनांक: ०१/०२/२०१९ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक : मा. शत्रुघ्न उर्फ बापु सिताराम काटे अनुमोदक : मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : मा. शत्रुघ्न उर्फ बापु सिताराम काटे यांचेकडील दिनांक २/१/२०१९ चा प्रस्ताव

प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागर येथे संपूर्ण महाराष्ट्रातील जवळ जवळ २ कि.मी. लांब (कोकणे चौक ते स्वराज चौक) लिनिअर अर्बन गार्डनचे काम चालू आहे. सदर गार्डन पिंपळे सौदागर तसेच पिंपरी चिंचवड शहरातील मानाचा तुरा म्हणुन ओळखले जाणार आहे. सदर प्रभाग हा स्मार्ट सिटीमध्येही समाविष्ट केला गेला आहे. त्यामुळे या परिसरात बहुतांश नागरीक या उद्यानाला पसंती देत आहेत. तरी या गार्डनला “श्री छत्रपती शिवाजी महाराज लिनिअर अर्बन गार्डन” असे नाव देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

----------

विषय क्र. ३ ठराव क्र. ४१

दिनांक: ०१/०२/२०१९ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक : मा. विठ्ठल उर्फ नाना काटे अनुमोदक : मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : मा. विठ्ठल उर्फ नाना काटे यांचेकडील दिनांक २/१/२०१९ चा प्रस्ताव

प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागर येथील पीसीएमसी मैदान, रोझ आयकॉन सोसायटी शेजारी पिंपळे सौदागर येथे गेल्या ३ वर्षापासुन श्री संत शिरोमणी सावतामाळी अभियानांतर्गत शेतकरी आठवडे बाजार श्री. नृसिंह ॲग्रो फार्म्स प्रोडयुसर कंपनी लि. मार्फत चालवला जात असुन सदर अभियानांतर्गत

पि.सी.एम.सी. मैदान, रोज आयकॉन सोसायटी जवळ, पिंपळे सौदागर , पुणे – २७ येथे दर रविवारी दुपारी ३ ते रात्री ८ या वेळेत आठवडा बाजार भरविण्यास महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालय, पुणे यांस मनपाने निश्चित केलेल्या आठवडे बाजार धोरणातील अटी शर्तीनुसार परवानगी देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------------

मा. सभापती : माहे फेब्रुवारी २०१९ चे सभेस सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे व सर्व सन्मा. सदस्यांचे आभार मानुन माहे फेब्रुवारी २०१९ ची मासिक सभा संपल्याचे जाहीर करतो.

सही/-
सभापती,
ड प्रभाग समिती,रहाटणी,
पुणे - ४११०१७

सही/-
प्रशासन अधिकारी,
ड क्षेत्रिय कार्यालय, रहाटणी,
पुणे ४११०१७

क्र. डक्षे/१३/१७/२०१९
दि. १६/०२/२०१९